अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । शुक्रवार
४.०९.२०२६
वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २१६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# शर्वरी हाडके हत्याकांड : आरोपी आनंद भड न्यायालयीन कोठडीत : तपासाचा वेग वाढला

## गोंदियातून अटक झालेल्या आरोपीविरुद्ध पुरावे मजबूत करण्यावर पोलिसांचा भर : न्यायासाठी नागरिकांचा लढा कायम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_अमरावती_ – रविनगर परिसरातील शर्वरी हाडके हत्याकांड प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी आनंद भड याच्या न्यायालयीन कोठडीनंतर पोलिसांनी तपासाला आणखी गती दिली आहे.**

या प्रकरणातील सर्व पुरावे, घटनाक्रम आणि आरोपीच्या हालचालींची सखोल पडताळणी सुरू असून, तपास पथक विविध तांत्रिक पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे प्रकरण अधिक भक्कम करण्याच्या तयारीत आहे. गोंदिया येथून आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर अमरावतीत संतापाची लाट उसळली होती. या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी शहरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला होता. नागरिकांमध्ये या घटनेबाबत तीव्र भावना व्यक्त होत असून, दोषीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सातत्याने होत आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीच्या मोबाईलमधील माहिती, कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर डिजिटल पुराव्यांची छाननी सुरू ठेवली आहे. घटनास्थळाशी संबंधित पुरावे न्यायवैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, त्यांचे अहवालही तपासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

दरम्यान, शर्वरी हाडके यांच्या कुटुंबीयांनी या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांनीही पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी आवाज उठवला आहे. पोलीस प्रशासनाने तपास निष्पक्ष आणि वेगाने सुरू असल्याचे सांगत, अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच भर द्यावा, असे आवाहन नागरिकांना केले आहे. या प्रकरणातील पुढील न्यायालयीन सुनावणी आणि तपासातील नवीन निष्कर्षांकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



**कुटुंबीयांची जलद न्यायाची मागणी**

शर्वरी हाडके यांच्या कुटुंबीयांनी या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालविण्याची मागणी केली आहे. 'आरोपीला केवळ अटक होणे पुरेसे नाही, तर त्याला कठोर शिक्षा मिळाली पाहिजे,' अशी भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. विविध सामाजिक संघटना, महिला संघटना आणि नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे.

## आरोपीला रस्त्यातच गोळ्या घाला

### खा.डॉ. अनिल बोंडे व आ.प्रवीण पोटे यांची राजापेठ ठाण्यात धडक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_अमरावती_** – अमरावती रवी नगरात घडलेल्या शर्वरी हाडके हत्याकांडातील आरोपी आनंद भड याला पोलिसांनी गोंदियातून अटक केल्यानंतर शहरात संतापाचा मोठा भडका उडाला. या पार्श्वभूमीवर खा.डॉ.अनिल बोंडे, आ.प्रवीण पोटे यांनी तातडीने राजापेठ पोलीस ठाणे गाठून पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांची भेट घेतली. अशा निर्दयी नराधमाला अमरावतीत आणताना रस्त्यातच गोळ्या घालून कायमचा संपवा, अशी संतप्त मागणी यावेळी करण्यात आली. या भयानक घटनेमुळे संपूर्ण अमरावती हादरली असून लोकांच्या मनात भयंकर चीड निर्माण झाली आहे. अशा नराधमाबर कसलीही दयानाया न दाखवता त्याला रस्त्यातच अद्दल घडवा, तरच पीडित मुलीच्या कुटुंबाला खरा न्याय मिळेल, अशी आक्रमक भूमिका यावेळी मांडली गेली. पोलिसांनी मात्र कायद्यानुसार पुढील कठोर तपास सुरू असल्याचे सांगितले.



## मारेकरी दहा तासात जेरबंद

### गोंदियातून संशयीत आरोपीला ठोकल्या बेड्या

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_अमरावती_** – स्थानिक शहरात घडलेल्या थरारक शर्वरी हाडके खून प्रकरणाचा राजापेठ पोलिसांनी अवघ्या दहा तासांत छडा लावला आहे. घटनेनंतर फरार झालेला संशयित आरोपी आनंद नंदकिशोर भट याला पोलिसांनी गोंदिया येथून शिताफीने ताब्यात घेतले. जुन्या मैत्रीतील दुरावा आणि वादातून त्याने शर्वरीवर भरदिवसा प्राणघातक हल्ला करुन तिची निघृण हत्या केली. मूळचा मूर्तिजापूरचा असलेला आनंद भट अमरावतीत राहून शिक्षण घेत होता. एका वातानुकूलन यंत्र दुरुस्तीच्या दुकानात काम करणाऱ्या आनंदची शर्वरीशी दोन-तीन वर्षांपासून ओळख होती. मात्र, महिन्या भरापूर्वीत्यांच्यात बिनसल्याने तो मूर्तिजापूरला परत गेला होता. शर्वरीच्या कॉलेजच्या वेळा ठाऊक असल्याने तो दुचाकीने अमरावतीत आला. रविनगर पुलाजवळ त्याने तिला गाठले. दोघांमध्ये काही मिनिटे जोरदार बाद झाला. रागाच्या भरात आनंदने बॅगेतील भाजी कापायची सुरी काढून शर्वरीवर सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या शर्वरीचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ चक्रे फिरवली आणि पळून गेलेल्या आनंदला गोंदियातून बेड्या ठोकल्या. या धक्कादायक घटनेने अमरावती परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पोलीस पुढील तपास करत आहेत.




## ड्रोन, रणगाडे, रॉकेट अन प्रचंड दारुगोळा

### भारतीय लष्कराची ताकद वाढणार! भारत- बेल्जियममध्ये १० मोठे करार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_मुंबई_** – भारत आणि बेल्जियम यांनी संरक्षण क्षेत्रात अनेक महत्त्वाचे करार केले आहेत. भारत आणि बेल्जियमने संरक्षण क्षेत्रात सहकार्यासाठी अनेक महत्त्वाचे करार केले आहेत. बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्या भारत दौऱ्यादरम्यान, १५ बेल्जियन संरक्षण कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही भेट दिली. दोन्ही देशांतील कंपन्यांमध्ये जवळपास १० करारांवर स्वाक्षरी झाली.



यामध्ये शस्त्रे, ड्रोन, सागरी सुरक्षा, सुरुंग निर्मूलन तंत्रज्ञान, रडार, दारुगोळा आणि इतर संरक्षण प्रणालींचा समावेश आहे. या सहकार्याचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे भारत केवळ तयार शस्त्रे खरेदी करण्यावर लक्ष केंद्रित करत नाहीये. तर दोन्ही देशांतील कंपन्या संयुक्तपणे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी आणि भारतात उत्पादन वाढवण्यासाठी पुढे सरसावत आहेत. याचा फायदा भारताच्या देशांतर्गत संरक्षण उत्पादनालाही होऊ शकतो.

## अट्टल केमिकल तस्कर अश्रफ खान अटकेत : टँकरमधून केमिकल चोरून ड्रममध्ये भरणारे ताब्यात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_पेण_** – मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे डोलवी येथे उभ्या टँकरमधून मालकाच्या संमतीशिवाय फायड्राझूर केमिकल चोरून ते ड्रममध्ये भरत असताना दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. रायगड जिल्ह्यात गेली अनेक वर्षे चोऱ्या करणाऱ्या अट्टल केमिकल तस्कर अश्रफ खान यालाही या कारवाईत अटक करण्यात आली आहे. ३० ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे २.४० वाजता मौजे डोलवी येथील हार्डवेअर रोडच्या बाजूला असलेल्या भंगार दुकानासमोरील मोकळ्या जागेत उभ्या टँकर (क्रमांक एमएच ४३ वाय ७१५२) मधून केमिकल चोरी करून ड्रममध्ये भरले जात होते. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे बंद केले असूनही वडखळ पोलीस स्टेशन हद्दीत मात्र वाढ होताना दिसत आहे.




## छत्रपती संभाजीनगरच्या एशियन हॉस्पिटलमध्ये भीषण आग

### ९ चिमुकल्यांसह ५८ रुग्ण थोडक्यात बचावले

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**_छत्रपती संभाजीनगर_** – छत्रपती संभाजीनगरमधून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. शहरातील एशियन हॉस्पिटलमध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आकाशवाणी चौकातील एशियन हॉस्पिटलमध्ये पहाटे पावणे तीनच्या सुमारास ही आग लागली असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, हॉस्पिटलच्या लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात म्हणजेच छखउणमध्ये आग लागल्याने एकच खळबळ उडाली असून आगीच्या वेळी छखउणमध्ये ९ बालकं उपचार घेत होती. तर एसीच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न, अवघ्या १० ते १५ मिनिटांत आगीवर नियंत्रण दरम्यान, आग लागल्याचं समजताच अग्निशमन दल, पोलीस आणि हॉस्पिटल कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू केलं. सर्व ९ बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलंय. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झालेली नाही. तर यातील ५ बालकांना घाटी रुग्णालयात, ३ बालकांना एमजीएम रुग्णालयात, तर एका बालकाला संजीवनी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलंय. दरम्यान, आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.




## गोव्यात लाभार्थ्यांना एका वर्षात ३ एलपीजी सिलेंडर मोफत मिळणार, बँक खात्यात दरवर्षी ३००० रुपये जमा होणार, भाजप सरकारची मोठी घोषणा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**_पणजी_** – गोव्यातील भाजप सरकारचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी एक मोठी घोषणा केली आहे. गोवा सरकार लाभार्थ्यांना प्रत्येक वर्षात तीन गॅस सिलेंडर मोफत देणार असल्याचं सावंत यांनी जाहीर केलं. या योजनेनुसार लाभार्थ्यांच्या खात्यात ९ सप्टेंबरपासून ३००० रुपयांची रक्कम जमा केली जाईल. प्रमोद सावंत यांच्या माहितीनुसार गोवा सरकारच्या या योजनेचा लाभ घेण्याासठी ५ सप्टेंबरपासून अर्ज करता येतील. हे अर्ज पंचायत कार्यालय आणि आमदारांच्या कार्यालयात उपलब्ध असतील. पणजीमधील एका कार्यक्रमाला संबोधित करताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटल की ही योजना २०२२ च्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाचा भाग होती. त्यावेळी लोकांना प्रत्येक वर्षी तीन एलपीजी गॅस सिलेंडर मोफत उपलब्ध करुन देण्याचं आश्वासनं दिलं होतं. प्रमोद सावंत म्हणाले, की ९ सप्टेंबरपासून लाभार्थ्यांच्या खात्यात दरवर्षी ३००० रुपये जमा होण्यास सुरुवात होईल. या वित्तीय मदतीमुळं पात्र लाभार्थी योजनेनुसार तीन एलपीजी गॅस सिलेंडरसाठीचा खर्च करु शकतात.





# आवाज मर्यादेतच ठेवा! पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – गणेशोत्सवात 'चार बेस, चार टॉप'च्या पुढे ध्वनिक्षेपकाची संख्या वाढविल्यास आवाजाची निर्धारित डेसिबल मर्यादा ओलांडली जाते. त्यामुळे अशा ध्वनियंत्रणांना परवानगी देणे संयुक्तिक ठरणार नाही. प्रेशर मीड, प्लाइम्मा आणि लेझर लाईट याला बंदी असून गणेश मंडळांनी चार बेस आणि चार टॉपच नियंत्रणात वाजवावेत, असे आवाहन पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी केले. गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजीत दहीहंडी व गणेशोत?स मंडळांच्या समन्वय बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते.

ते म्हणाले, गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी पोलीस दल गणेश भक्तांच्या सोबत ठामपणे उभे आहे. मंडळांनी पोलीस दलावर यापूर्वी दाखविलेला विश्वास पुढेही कायम राहील, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला. डीजेची संख्या वाढवून आवाजाची मर्यादा ओलांडत असल्यास नियमांचे उल्लंघन होते. चार



बेस व चार टॉपच्या मर्यादेत ध्वनी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

नियमांचे पालन न झाल्यास पोलिसांना कायद्यानुसार कारवाई करावी लागेल; मात्र पोलिसांना गुन्हे दाखल करण्याची मानसिकता नसून समन्वयाने उत्सव पार पाडण्याला प्राधान्य असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

गणेश मंडळांना परवानगी मिळण्यास विलंब होऊ नये, यासाठी मागील परवानग्या ग्राह्य धरून आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचेही आयुक्तांनी सांगताना साऊंडसाठी दोन दिवसाच्या परवानगीची गरज नसल्याचेही आयुक्त म्हणाले.

गणेशोत्सव आणि दहीहंडीमध्ये लेझर लाईटचा वापर करू नये असेही अवाहन त्यांनी केले.

## तापमान

| | | कमाल | किमान |
|---|---|---|---|
| अमरावती | | २९ | २४ |
| यवतमाळ | | २८ | २१ |
| अकोला | | २७ | २४ |
| वाशिम | | २८ | २३ |
| बुलढाण | | २७ | २२ |
| वर्धा | | ३० | २३ |
| नागपूर | | २९ | २४ |
| चंद्रपुर | | २९ | २५ |
| गडचिरोली | | २८ | २३ |
| नाशिक | | २६ | २२ |
| पुणे | | ३० | २१ |

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तेल काढणी युनीट करिता अर्ज करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया सन २०२६-२७ अंतर्गत काढणी पश्चात पायाभूत सुविधा घटकांतर्गत तेल काढणी युनीट करिता शेतकरी, शासकीय किंवा खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ), सहकारी संस्था, तेलावर प्रक्रिया करणाऱ्या नोंदणीकृत नवीन कंपनी तसेच या योजनेंतर्गत निवडलेले मुल्यसाखळी भागीदार यांना येत्या ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

या राष्ट्रीय अभियानांतर्गत बियाणे संकलन आणि तेल काढण्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी १० टन क्षमतेचे तेल काढणी युनीट आणि तेलबियांवर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रसामग्री व उपकरणे तसेच तेलबिया प्रक्रिया युनीट करिता प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के कमाल किंवा ९ लाख ९० हजार रूपये यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहणार आहे.

काढणी युनीट करिता खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री भारतीय मानक ब्युरो किंवा सक्षम गुणवत्ता मानकाचे पालन करणारी असावी तसेच याकरिता इच्छूक भागदाराने बँकेकडे कर्ज मंजुरी करिता प्रकल्प सादर करावा लागणार आहे.

बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर अर्जदार या योजनेच्या लाभास पात्र राहणार असून ३१ सप्टेंबर २०२६ पर्यंत त्यांना संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे अर्ज करता येणार आहे. अधिक माहितीसाठी गावातील सहायक कृषी अधिकारी,उपकृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधता येणार आहे.

# वरूड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करा : शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन

## प्रति हेक्टर ५० हजार रुपयांच्या मदतीसह संत्रा-मोसंबी फळगळ भरपाईची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरूड** – वरुड तालुक्यात कमी पाऊस आणि पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिकांसह संत्रा व मोसंबीच्या मृग बहाराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करुन धरणे आंदोलन केले. तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण वरुड तालुक्यात अपुऱ्या पावसामुळे तूर, कापूस, सोयाबीन, मिरची, वांगी, टोमॅटो, मका, ज्वारी यांसह इतर खरीप पिकांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. त्याचबरोबर संत्रा व मोसंबीच्या मृग बहारातील फळांची मोठ्या प्रमाणात गळती झाल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. खत, फवारणी, औषधे, मजुरी, मशागत आणि बागेच्या देखभालीचा खर्च सातत्याने वाढत असताना उत्पन्नाचा प्रमुख आधारच डळमळीत झाल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले. निवेदनात मृग बहार आणि आंबिया बहार हे स्वतंत्र कालावधीचे बहार असल्याने सध्याच्या फळगळीचा स्वतंत्र पंचनामा करून शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सन २०२५ मधील अतिवृष्टीचे उर्वरित मंजूर अनुदान, सन २०२३ व २०२४ मधील अतिवृष्टी आणि गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान, सन २०२५-२६ च्या आंबिया बहार फळपीक विम्याची रक्कम तसेच सन २०२६ च्या आंबिया बहारासाठी मंजूर गारपीट अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणीही करण्यात आली.

शासनाने वरुड तालुका तात्काळ कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करुन संत्रा, मोसंबी आणि खरीप पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, अशी एकमुखी मागणी आंदोलनकर्त्यांनी शेतकऱ्यांनी केली.

या धरणे आंदोलनात अंकुश बोडनासे, अमोल भुयार, मनीष धोटे, सुशील बेले, नरेंद्र उर्फ बबलुभाऊ पावडे, बाबाराव मांगुळकर, स्वप्नील खांडेकर, तुषार निकम, ज्ञानेश्वर यावले, निकेश खंते, ज्ञानेश्वर भोंडे, अमोल उपासे आणि पुरुषोत्तम गुर्जर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

# शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीसाठी उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया गुरुवार पासून सुरू झाली. यासंदर्भातील सविस्तर जाहीर सूचना व वेळापत्रक नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर अपर आयुक्त कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार संपूर्ण पडताळणी प्रक्रिया शनिवार पर्यंत पार पडणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या २४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखतीशिवाय निवड झालेल्या प्राथमिक शिक्षक- ९२७, माध्यमिक शिक्षक- ४२१ आणि उच्च माध्यमिक शिक्षक- २५२ अशा एकूण १६०० उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. त्यात पेसा क्षेत्रातील ४५९ तर नॉन-पेसा क्षेत्रातील ११४१ उमेदवारांचा समावेश आहे. संबधित उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक अर्हता कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. नाशिक विभागात सर्वाधिक पात्र ५८८ उमेदवार असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ४२४ उमेदवार, नागपूर विभागात २९६ उमेदवार तर अमरावती विभागात २९२ उमेदवार आहे. संबंधित उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे, जाहिरातीनुसार लागणारी कागदपत्रे आणि प्रत्येक कागदपत्राची एक साक्षांकित (self-attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. निर्धारित केलेल्या दिनांक व वेळेत अनुपस्थित राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. पात्र उमेदवारांची सविस्तर यादी https://tribal.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याचे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

# न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांची स्मृती भवन व विज्ञान अभिनव उपकेंद्रास शैक्षणिक क्षेत्रभेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल वरुड येथील विद्यार्थ्यांनी अमरावती येथील डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख स्मृती भवन व विज्ञान अभिनव उपकेंद्रास शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील विषयाची प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि विविध वैज्ञानिक संकल्पना समजाव्यात या उद्देशाने या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध प्रयोग उपकरणे व उपक्रमाची माहिती घेतली. विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून समजुन घेत विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकाचे निरसन करुन घेतले. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासोबतच त्यांच्यामध्ये जिज्ञासा निरीक्षण शक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक भेटीचा उत्स्फूर्तपणे आनंद घेतला पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभवातुन मिळणारे ज्ञान अधिक प्रभावी असते, असा अनुभव विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली झालेली ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांची ज्ञानवर्धक व अविस्मरणीय ठरली.

## न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलचा

# तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सवात प्रथम क्रमांक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – विज्ञान आणि समाज यांच्यातील परस्-परसंबंध प्रभावीपणे मांडणाऱ्या तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव सन २०२६-२७ मध्ये न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. ही स्पर्धा स्थानिक स्कूल ऑफ स्कॉलर्स, वरुड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सवाचा मुख्य विषय 'विज्ञान आणि समाज' हा होता. त्याअंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहने, अंतराळातील मानवी वस्ती आणि समुद्रांचे पुनरुज्जीवन हे उपविषय देण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील एकूण आठ शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वच शाळांनी विज्ञानाच्या विविध पैलूंवर आधारित अतिशय सुंदर व नाविन्यपूर्ण नाट्य सादरीकरण केले.

न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'अंतराळातील मानवी वस्ती' हा विषय निवडून भविष्यात मानवाने अंतराळात वस्ती निर्माण करताना येणाऱ्या संधी, आव्हाने, पर्यावरण संवर्धन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे प्रभावी चित्रण आपल्या नाटकातून केले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयासोबतच संवादफेक, नेपथ्य, विषयाची मांडणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यामुळे त्यांच्या सादरीकरणाला विशेष दाद मिळाली.

या नाट्य सादरीकरणात प्रज्वल पन्नासे, भूमी पांडे, तेजस्विनी कुरवाडे, अर्षद काझी, आलिया काझी, दिप्नेश पापडकर, आयुष डहाके , आरुषी डांगे इत्यादी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या अभिनयाची छाप पाडली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन स्कूल ऑफ स्कॉलर्सचे प्राचार्य सुनित दुबे लाभले तर प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थितअशोक घोरमाडे, डी.के.देशपांडे, डी.के.गोडबोले होते. स्पर्धेचे परीक्षण चंदू पाखरे आणि जितेंद्र शेटीये यांनी केले.

विद्यार्थ्यांना या नाट्यप्रयोगासाठी मार्गदर्शक शिक्षिका नंदिनी ठाकरे यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले तसेच नाटकाच्या यशस्वी सादरीकरणासाठी लक्षता देशमुख आणि प्रियंका राऊत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक अशोक चौधरी तसेच उपमुख्याध्यापक एस.पी.देशमुख, पर्यवेक्षक प्रमोद केणे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षिका नंदिनी ठाकरे यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# संपादकीय

**आयुष्यात ‘पैसा’ म्हणजे सर्वकाही नाही, असं म्हणण्यापूर्वी पुरेसा ‘पैसा’ कमवा.**

## रोबोटांच्या महासत्तेकडे चीनची वाटचाल की कृत्रिम बुद्धिमत्तेची जागतिक शर्यत?

‘मोठ्या संख्येने रोबोट तयार करण्यामागे चीनचा केवळ उत्पादन विक्रीचा हेतू नसू शकतो. अधिक रोबोट म्हणजे अधिक प्रयोग; अधिक प्रयोग म्हणजे अधिक डेटा; अधिक डेटा म्हणजे अधिक सक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता.‘ हे विधान आजच्या जागतिक तंत्रज्ञान स्पर्धेचे वास्तव अधोरेखित करते. चीन केवळ कारखाने उभारत नाही, तर तो भविष्यातील कृत्रिम बुद्धिमत्तेचे साम्राज्य उभारण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे चित्र दिसत आहे. एकेकाळी जगाचे उत्पादन केंद्र म्हणून ओळखला जाणारा चीन आता ‘बुद्धिमान उत्पादन‘ या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. औद्योगिक रोबोट, मानवरूपी रोबोट, सेवा रोबोट, वैद्यकीय रोबोट आणि स्वयंचलित यंत्रणा यांच्या निर्मितीत चीनने मोठी झेप घेतली आहे. अनेक चिनी कंपन्या दरवर्षी लाखो रोबोट तयार करत आहेत. हे केवळ उद्योगांचे आधुनिकीकरण नाही, तर डेटा गोळा करण्याची एक व्यापक रणनीतीही असू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेची खरी ताकद केवळ शक्तिशाली संगणकांमध्ये नसते; ती डेटामध्ये असते. एखादा रोबोट चालतो, वस्तू उचलतो, माणसाशी संवाद साधतो किंवा कारखान्यात काम करतो, तेव्हा तो प्रत्येक क्षणी नवीन माहिती निर्माण करत असतो. कोणती हालचाल यशस्वी झाली, कुठे चूक झाली, कोणत्या परिस्थितीत कोणता निर्णय योग्य ठरला, याचा प्रचंड डेटा तयार होतो. लाखो रोबोट एकाच वेळी काम करत असतील, तर हा डेटा अक्षरशः महासागरासारखा वाढतो. याच डेटावर कृत्रिम बुद्धिमत्तेची पुढची पिढी अधिक सक्षम बनते. आज अमेरिकेतील OpenAI, Google, NVIDIA यांसारख्या कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात आघाडीवर आहेत. पण चीनची रणनीती वेगळी दिसते. तो प्रयोगशाळेत मर्यादित राहण्याऐवजी प्रत्यक्ष जीवनात एआय उतरवत आहे. कारखान्यांपासून रुग्णालयांपर्यंत, गोदामांपासून घरगुती सेवांपर्यंत रोबोट पोहोचत आहेत. प्रत्येक ठिकाणी ते अनुभव घेत आहेत आणि शिकत आहेत. चीनसमोर लोकसंख्येचे वृद्धत्व हे मोठे आव्हान आहे. कामगारांची संख्या हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे उत्पादनक्षमता टिकवण्यासाठी रोबोट आवश्यक ठरत आहेत. पण या गरजेचा उपयोग चीनने दीर्घकालीन तंत्रज्ञान धोरणासाठी केला आहे. सरकारने ‘चरवश ळप उहळपर २०२५‘ आणि त्यानंतरच्या विविध योजनांद्वारे रोबोटिक्स, सेमीकंडक्टर आणि एआय क्षेत्रात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. मानवरूपी रोबोट हा या शर्यतीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कारण माणसांसाठी तयार केलेल्या जगात काम करण्यासाठी माणसासारखे चालणारे, पाहणारे आणि निर्णय घेणारे रोबोट अधिक उपयुक्त ठरतात.




# प्रा.किशोर तडस : सामाजिक बांधिलकीतुन घडलेले प्रभावशाली अजातशत्रु व्यक्तिमत्व



समाजात काही व्यक्ती आपल्या पदामुळे किंवा प्रतिष्ठेमुळे ओळखल्या जातात; तर काही व्यक्ती आपल्या कार्यातून आणि माणुसकीच्या नात्यांतून समाजाच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. प्रा.किशोर तडस हे अशाच प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव. शिक्षण क्षेत्राशी असलेली नाळ जपत सामाजिक बांधिलकीची जाणीव मनात ठेवून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे आणि गरजूंच्या मदतीसाठी सदैव पुढाकार घेणारे व्यक्तिमत्व म्हणुन त्यांची ओळख निर्माण झाली आहे ते स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालय गेला २१ वर्षापासून कार्यरत असून गेल्या १२ वर्षापासून प्राचार्य पदाची धुरा अत्यंत कर्तव्यदक्षपणे ते जोपासत आले आहे. तरुण वयातच त्यांच्या प्रभावी आणि तंत्रज्ञान स्नेही वृत्तीमुळे त्यांना प्राचार्य व शिक्षक प्रशिक्षक संघटना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची अध्यक्ष पद देण्यात आले. एवढंच नव्हे तर त्याचे प्रत्येक विद्यार्थ्यांसोबत अत्यंत स्नेह व विश्वासाचे संबंध निर्माण होतात , प्रत्येक विद्यार्थ्यांना ते स्वतःहून नावाने ओळखतात हे त्यांचे विशेष आहे. त्यांना सतत प्रेरित करून त्यांच्या इस्पित ध्येयापर्यंत पोहोचण्यामध्ये त्यांचा महत्त्वपूर्ण हात असतो. त्यांच्या मार्गदर्शन हजारो विद्यार्थ्यांना आजपर्यंत रोजगार प्राप्त झाला आहे. प्रा.किशोर तडस यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात महत्त्वाचा पैलु म्हणजे सतत सहकार्य करण्याची भूमिका. कोणत्याही सामाजिक, शैक्षणिक किंवा सार्वजनिक उपक्रमात शक्य ते योगदान देण्याची त्यांची वृत्ती अनेकांना प्रेरणा देणारी आहे. स्वतःपुरते मर्यादित न राहता समाजातील विविध घटकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी आपल्या परीने हातभार लावणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची विशेष ओळख आहे.

### शिक्षणासोबत सामाजिक जाणीव

प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देताना समाजाप्रती असलेली जबाबदारीही त्यांनी कायम जपली आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान न राहता विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण करणारे माध्यम असावे, या विचारातून त्यांचा सामाजिक दृष्टिकोन घडलेला दिसून येतो.

विद्यार्थी, शिक्षक, पालक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधताना त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन जाणवतो. त्यामुळेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग केवळ औपचारिक न राहता सक्रिय आणि सकारात्मक स्वरूपाचा असतो.

### सहकार्याची भूमिका हीच कार्याची ओळख

समाजकार्यात मोठमोठ्या घोषणा करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीला महत्त्व देणारी व्यक्तिमत्त्वे समाजात अधिक काळ लक्षात राहतात. प्रा.किशोर तडस यांची कार्यशैलीही याच विचाराशी जोडलेली आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा सार्वजनिक स्वरूपाचा उपक्रम असो, त्यामध्ये आपली भूमिका सकारात्मक पद्धतीने बजावण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

एखाद्या व्यक्तीला मदतीची गरज असो, एखाद्या उपक्रमाला सहकार्याची आवश्यकता असो किंवा समाजहिताचा एखादा विषय पुढे नेण्याची गरज असो, अशा वेळी शक्य ते सहकार्य करण्याची त्यांची भूमिका त्यांना इतरांपेक्षा वेगळे स्थान मिळवून देते. त्यामुळे विविध क्षेत्रातील व्यक्तींशी त्यांचे आत्मीय संबंध निर्माण झाले आहेत.

### माणसे जोडण्याची हातोटी

प्रा.किशोर तडस यांच्या व्यक्तिमत्वातील आणखी एक महत्वाचा गुण म्हणजे माणसे जोडण्याची हातोटी. समाजात काम करताना मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र मतभेदांपेक्षा संवादाला आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य देत सर्वांना सोबत घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. यामुळेच त्यांचा मित्रपरिवार आणि सामाजिक संपर्काचा परीघ व्यापक आहे. विविध क्षेत्रातील व्यक्तींशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध ही त्यांच्या सामाजिक कार्याची मोठी ताकद मानली जाते.

### तरुणांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व

आजच्या काळात तरुण पिढीने सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. समाजातील प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे, गरजु व्यक्तीच्या मदतीला धावून जाणे आणि सार्वजनिक हिताच्या उपक्रमांमध्ये योगदान देणे, या मूल्यांची जपणूक प्रा.किशोर तडस यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांच्या सकारात्मक विचारसरणीमुळे आणि सामाजिक सहभागामुळे अनेकांना प्रेरणा मिळते. विशेषतः शिक्षण क्षेत्राशी संबंधित असल्याने तरुणांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

### चर्चेत राहण्यामागे कार्याची पार्श्वभूमी

सामाजिक क्षेत्रात एखादे व्यक्तिमत्व सतत चर्चेत राहते, त्यामागे केवळ प्रसिद्धी नसते; तर त्यामागे सातत्याने केलेले काम, लोकांशी असलेला संवाद आणि समाजासाठी उभे राहण्याची वृत्ती असते. प्रा.किशोर तडस यांच्याबाबतही हेच अधोरेखित होते. कोरोना काळात सव्वा लाख गरजू लोकांना ऑरेंज सिटी लंच बॉकसब च्या माध्यमातून अन्नदान करण्यात त्यांची आरंभशूरता अधोरेखित करण्यासारखी होती, दुसऱ्या लाटेत कोविड औषध दान समितीची स्थापना करुन हजारो गरीब व गरजूंना मोफत औषध उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. विक्रम ठाकरे यांच्या ‘डिजल तुमचे बाकी आमचे‘ हा उपक्रम राबवुन शेकडो कोविड ग्रस्त रुग्णांना अमरावती नागपुरात पोहचवून देणाऱ्या उपक्रमाचे सारथी किशोर तडस होते. विविध सामाजिक कार्यात सहभाग, गरजूंसाठी सहकार्याची भावना, सकारात्मक विचार आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे.

### नव्या वर्षात नव्या संकल्पांची अपेक्षा

वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून आजवरच्या वाटचालीचे चिंतन आणि भविष्यातील कार्याची दिशा निश्चित करण्याचा दिवस असतो. प्रा. किशोर तडस यांच्या आजवरच्या सामाजिक आणि शैक्षणिक वाटचालीकडे पाहता, आगामी काळातही त्यांच्या हातून समाजोपयोगी कार्याला अधिक व्यापक स्वरूप मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या अनुभवाचा, सामाजिक संपर्काचा आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा उपयोग समाजातील विविध घटकांना व्हावा, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे योगदान अधिक वृद्धिंगत व्हावे, हीच वाढदिवसानिमित्त सदिच्छा. सामाजिक बांधिलकी, सहकार्याची वृत्ती आणि सकारात्मक विचारांची साथ घेऊन वाटचाल करणाऱ्या प्रा.किशोर तडस यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या आयुष्यात सुख, समाधान, उत्तम आरोग्य आणि यशाची नवी शिखरे लाभोत, हीच सदिच्छा.



नितीन ठाकरे
मुख्याध्यापक पानसे विद्यालय, वरुड

# श्रीकृष्ण जन्माष्टमी : भक्ती, कर्म आणि जीवनमूल्यांचा उत्सव

भारतीय संस्कृतीत सण–उत्सवांना केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वही आहे. प्रत्येक सणामागे एखादा आदर्श, संदेश आणि जीवनाला दिशा देणारे तत्त्वज्ञान दडलेले असते. अशाच पवित्र सणांपैकी एक म्हणजे श्रीकृष्ण जन्माष्टमी. भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला मध्यरात्री भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला, अशी श्रद्धा आहे. हा दिवस संपूर्ण भारतात मोठ्या भक्तिभावाने, उत्साहाने आणि जल्लोषात साजरा केला जातो. मंदिरांमध्ये विशेष पूजा, भजन–कीर्तन, दहीहंडी, झांकी आणि गीतेचे पठण यामुळे वातावरण भक्तिमय होते.

### अधर्मावर धर्माचा विजय

द्वापरयुगात मथुरेचा राजा कंस अत्यंत क्रूर आणि अत्याचारी होता. त्याची बहीण देवकी आणि तिचा पती वसुदेव यांच्या आठव्या पुत्रामुळे आपला मृत्यू होईल, अशी आकाशवाणी झाल्यानंतर कंसाने त्यांना तुरुंगात टाकले. देवकीच्या सात मुलांचा त्याने निर्दयपणे वध केला. मात्र आठव्या अपत्याच्या जन्माच्या रात्री दैवी चमत्कार घडला. तुरुंगाचे दरवाजे आपोआप उघडले, पहारेकरी गाढ झोपले आणि वसुदेवांनी नवजात श्रीकृष्णाला यमुना नदी ओलांडून गोकुळात नंद–यशोदा यांच्या घरी सुरक्षित पोहोचवले. तेथे यशोदेच्या कन्येला घेऊन ते परत आले. अशा प्रकारे श्रीकृष्णाचे बालपण गोकुळ–वृंदावनात गेले आणि पुढे त्यांनी कंसाचा वध करून अधर्माचा अंत केला.

### बालकृष्णाच्या लीलांचे आकर्षण

श्रीकृष्णाचे बालपण भारतीय लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोणी चोरणारा ‘माखनचोर‘, गोप–गोपिकांसोबत खेळणारा कान्हा, यमुनेतील कालिय नागाचे मर्दन करणारा वीर आणि गोवर्धन पर्वत उचलून गोकुळवासीयांचे रक्षण करणारा देव म्हणून त्यांची ओळख आहे. या कथा केवळ मनोरंजनासाठी नाहीत, तर संकटात धैर्य, प्रेम, समता आणि संरक्षणाची भावना शिकवणाऱ्या आहेत.

गोपाळकृष्णाचे निष्पाप हास्य, बासरीचा मधुर नाद आणि सर्वांना आपलेसे करणारा स्वभाव यामुळे कृष्ण प्रत्येकाच्या मनात घर करून राहतात. त्यामुळे जन्माष्टमीच्या दिवशी अनेक ठिकाणी बालकृष्णाचा पाळणा सजवून त्याला झोका दिला जातो.

### भगवद्गीतेचे अमूल्य तत्त्वज्ञान

श्रीकृष्णाच्या जीवनातील सर्वात मोठी देणगी म्हणजे भगवद्गीता. महाभारताच्या युद्धभूमीवर अर्जुन संभ्रमात पडला असताना श्रीकृष्णाने त्याला कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोगाचा उपदेश केला. ‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन‘ हा संदेश आजही प्रत्येकाला प्रेरणा देतो. आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करावे, फळाची अपेक्षा न



ठेवता सत्कर्म करत राहावे, हे गीतेचे सार आहे.

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात गीतेतील तत्त्वज्ञान मानसिक शांतता, योग्य निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास देणारे आहे. म्हणूनच गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवन व्यवस्थापनाचा मार्गदर्शक मानला जातो.

### जन्माष्टमीचा उत्सव

जन्माष्टमीच्या दिवशी अनेक भक्त दिवसभर उपवास करतात. मध्यरात्री बारा वाजता श्रीकृष्णाच्या जन्माचा सोहळा साजरा केला जातो. मंदिरांमध्ये घंटानाद, शंखनाद आणि आरतीने वातावरण भारावून जाते. बालकृष्णाचा पाळणा फुलांनी सजवला जातो आणि भक्त त्याला झोका देतात.

महाराष्ट्रात या सणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दहीहंडी उत्सव. श्रीकृष्णाला दही–लोणी अत्यंत प्रिय होते. त्या आठवणीने उंचावर बांधलेल्या हंडीपर्यंत पोहोचण्यासाठी गोविंदा पथके मानवी मनोरे रचतात. ‘गोविंदा आला रे!‘ या जयघोषाने परिसर दुमदुमून जातो. हा खेळ केवळ मनोरंजन नसून संघभावना, विश्वास, शिस्त आणि धैर्य यांचे प्रतीक आहे.

### भारतभर विविध परंपरा

भारताच्या प्रत्येक राज्यात जन्माष्टमी वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. मथुरा आणि वृंदावन येथे भव्य झांकी, रासलीला आणि कीर्तनाचे आयोजन होते. महाराष्ट्रात दहीहंडीचा उत्सव विशेष आकर्षण असतो. गुजरातमध्ये गरबा आणि रासदांडिया साजरा केला जातो. दक्षिण भारतात घरासमोर लहान मुलांच्या पावलांचे ठसे काढून कृष्णाचे आगमन दर्शवले जाते. या विविध परंपरा भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचे सुंदर दर्शन घडवतात.

### आजच्या काळातील श्रीकृष्णाचा संदेश

आजच्या समाजात तणाव, स्वार्थ, स्पर्धा आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास वाढताना दिसतो. अशा वेळी श्रीकृष्णाचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो.

**संकटात धैर्य गमावू नका.**

सत्य आणि न्यायाच्या बाजूने उभे रहा.

**कर्तव्याला सर्वोच्च स्थान द्या.**

**प्रेम, मैत्री आणि करुणा जपा.**

**अहंकाराचा त्याग करा.**

श्रीकृष्णाने आयुष्यभर विविध भूमिका निभावल्या बालक, मित्र, गुरू, राजकारणी, योद्धा आणि तत्त्वज्ञ. प्रत्येक भूमिकेत त्यांनी संतुलन आणि जबाबदारीचे महत्त्व दाखवून दिले.

### पर्यावरणपूरक उत्सवाची गरज

आधुनिक काळात सण साजरे करताना पर्यावरणाची काळजी घेणे आवश्यक आहे. प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक फुले, मातीचे दिवे आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरावे. दहीहंडी उत्सवात सुरक्षिततेचे नियम पाळणे, ध्वनीप्रदूषण टाळणे आणि पाण्याचा अपव्यय कमी करणे हीदेखील समाजाची जबाबदारी आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये

# पालक व शिक्षक सहविचार सभेचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.१ येथे पालक व शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. या सभेत नवीन शाळा व्यवस्थापन समिती गठीत करणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उंचावणे, पालक–शिक्षक समन्वय वाढविणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी नियोजन करणे हा सभेचा प्रमुख उद्देश होता.

सभेत शाळा व्यवस्थापन समितीच्या नवीन अध्यक्ष व कार्यकारिणीची निवड, विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास व शैक्षणिक प्रगती, तसेच मंथन सामान्य ज्ञान परीक्षा, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांच्या तयारीबाबत महगत्वपुर्ण चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वाचन व स्पर्धा परीक्षांचा सराव करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासोबतच पालकांनीही विद्यार्थ्यांच्या अभ्यासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. शाळा आणि पालक यांच्या संयुक्त प्रयत्नातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया घालण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.



सभेला मुख्याध्यापक आशिष तडस, जेष्ठ शिक्षक साहेबराव उईके, विजय बेलसरे, संदीप कोकाटे, सविता बोबडे, भाग्यश्री चौधरी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी हर्षदा श्रीखंडे, अनिता दुपारे यांनी उपस्थित राहून आपले बहुमूल्य योगदान दिले. कार्यक्रमाचे संचालन विजय बेलसरे, मार्गदर्शन आशिष तडस व संदीप कोकाटे तर उपस्थितांचे आभार सविता बोबडे यांनी मानले.

**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |

उत्क्रांती मंडळ जरूड द्वारा संचालित वसंतराव नाईक हायस्कूल येथे

# विद्यार्थी निवडणुक प्रक्रिया उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सत्र २०२६–२०२७ मध्ये वर्ग ९ आणि १० च्या विद्यार्थ्यांची निवडणुक प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. प्रामुख्याने या प्रक्रियेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.




ज्याप्रमाणे राजकीय वलयात निवडणुकीचा प्रचार प्रसार केला जातो, याशिवाय ज्या पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबविली जाते, त्याच पार्श्वभूमीवर शाळा स्तरावर सुंदर असे आयोजन रंजना शेळके यांनी केलेले होते. शाळेतील अनेक विद्यार्थी या प्रक्रियेमध्ये वेगवेगळ्या भूमिकेत सहभागी झालेले होते. सर्व शिक्षकवृंद यासाठी निरंतर प्रयत्न करीत होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्रशासन अधिकारी रामराव वानखडे यांनी निवडणुक प्रक्रिया तसेच लोकसभा, राज्यसभा, संसद या स्तरावर निवडून आलेल्या प्रतिनिधींची निवड प्रक्रिया होते, त्यासंदर्भात मार्गदर्शन केले. याशिवाय सुषमा मानेकर, एन.आर.सिसोदे, शिवकुमार चव्हाण, धर्मेंद्र राईकवार, कृष्णा कळसकर, अनिल सलामे यांनी सुद्धा या प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. विद्यार्थ्यांनी अगदी पोलिंग ऑफिसर, त्याशिवाय जे उमेदवारांचे प्रतिनिधी आहेत किंवा मुख्य अधिकारी आहेत या सर्वच भूमिकेत कामकाज पाहिले.

निवडणुक प्रक्रिया घेत असताना बॅलेट पेपरवर केलेले वोटिंग आणि मतमोजणी प्रक्रिया अगदी शासकीय नियमानुसार जशी घेतली जाते त्याच पद्धतीने घेण्यात आली. सर्व शिक्षकांनी त्यासाठी प्रामाणिक सहकार्य करुन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. निवडणूक म्हणजे काय असते आणि प्रत्येक प्रतिनिधी कशा पद्धतीने निवडला जातो? या संदर्भातील संपूर्ण प्रत्यक्ष कृतीद्वारा विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. प्रत्येक विद्यार्थ्यांनी त्या संदर्भातील स्वतः घेतलेली अनुभूती ही त्यांच्यासाठी मोठी उपलब्ध होती. याप्रसंगी मुख्याध्यापक देवराळे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अतिशय शांततेत व नियमानुसार निवडणुक प्रक्रिया संपन्न झाली.

एच.के.एम.उर्दू हायस्कूलमध्ये

# टेक्नॉलॉजिकल एॅडव्हान्समेंट विषयावर मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक एच.के.एम.उर्दू हायस्कूल येथे 'टेक्नॉलॉजिकल एॅडव्हान्समेंट' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर सेमिनारचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमात वोडाफोन इंटेलिजन्स सोल्युशन्स पुणे येथील अभियंता उमेश वंजारी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानातील नव्या घडामोडींविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी त्यांनी गुगल, मायक्रोसॉफ्ट, इंटरनेट, लेझर टेक्नॉलॉजी, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. इंटरनेटचा योग्य व जबाबदारीने वापर करण्याचे महत्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन करुन तंत्रज्ञानाशी सुसंगत कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले. आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात संगणक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने वेळेचे नियोजन करत संगणक शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन उमेश वंजारी यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अब्दुल शकील होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातुन उमेश वंजारी यांच्या कार्यप्रवासाचा परिचय करुन देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार मांडले. यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन उमेश वंजारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला नईम शेख जरुडकर, सय्यद सादिक, मिर्झा शहजाद अख्तर, अब्दुल कलीम, फरीदा यास्मिन यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार नईम अहमद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नाझीम खान व तौफिक अहमद यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ...तरच व्यापार करार! भारताला सवलतीचे दर द्या : केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांचा अमेरिकेला इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत अमेरिकेने भारताला सवलतीचे दर दिल्यानंतरच अमेरिकेसोबतच्या द्विपक्षीय व्यापार कराराचे तपशील जाहीर केले जातील, असा इशारा



केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी गुरुवारी दिला. वाणिज्य मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'मुक्त व्यापार करारांचा फायदा घेणे' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत गोयल यांनी देशातील उद्योजकांना आणि एमएसएमईना याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. बांगलादेश आणि व्हिएतनामसारख्या देशांना एलडीसी दर्जा किंवा एफटीएचा फायदा मिळत असल्याने भारतीय वस्त्रोद्योगाला त्यांच्याशी स्पर्धा करणे कठीण जात होते. मात्र, आता भारताने बहुतांश विकसित बाजारांमध्ये प्रतिस्पर्ध्यांपेक्षा उत्तम दर मिळवले आहेत. आता चेंडू पूर्णपणे आपल्या कोर्टात आहे. त्यामुळे भारतीय उद्योगांनी उत्पादनाचा दर्जा, प्रमाण, ग्राहकांचा विश्वास आणि वेळेत ऑर्डर पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. निर्यातदारांना या पार्क्समध्ये प्राधान्याने जागा आणि सुविधा दिल्या जातील. प्रत्येक राज्याने अशा उत्पादनांची आणि क्लस्टर्सची ओळख पटवावी जिथे एफटीएचा फायदा आधीच होत आहे किंवा जिथे अजून फायदा घेणे बाकी आहे. जुलै २४ पासून अमेरिकेने भारतासह अनेक देशांवर १०% अतिरिक्त शुल्क लागू केले आहे. या पार्श्वभूमीवर, ३० सप्टेंबरपासून मिलवॉकी येथे होणाऱ्या जी–२० व्यापार मंत्री परिषदेदरम्यान गोयल अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांची भेट घेऊन चर्चा करतील. अमेरिका २०२६ च्या जी–२० चे अध्यक्षपद भूषवत आहे. चालू वर्षासाठी भारताने १ ट्रिलियन निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. पहिल्या चार महिन्यांतच निर्यातीने ३१७ बिलियनचा टप्पा गाठला आहे (मागील वर्षी याच काळात ही निर्यात २८० बिलियन होती).


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४५/२०२६ — ने.ता.०६/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) सतीश रामचंद्र रोषनखेडे, वय अं.५१ वर्ष, धंदा–शेती रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

२) मनिष रामचंद्र रोषनखेडे, वय अं.५४ वर्ष, धंदा– नोकरी रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

३) सौ.भारती गणेशराव भोयर, वय अं.५६ वर्ष, धंदा– गृहीणी रा.मोहता कॉलेज जवळ, हनुमान नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामचंद्र विठोबाजी रोषनखेडे व मयत अनुसया रामचंद्र रोषनखेडे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८, अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर, साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३८/२०२६ — ने.ता.२९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रमोद देविदास मालपे, वय अं.४६ वर्ष, धंदा–मजुरी

२) किशोर देविदास मालपे, वय अं.४४ वर्ष, धंदा– मजुरी

३) विनोद देविदासराव मालपे, वय अं.३२ वर्ष, धंदा– मजुरी

तिघेही रा.ब्राम्हणपुरी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुनिल शिवाजी घारड व मयत प्रतिभा सुनिलराव घारड, रा.घोराड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८, अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर, साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३८/२०२६ — ने.ता.२९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रमोद देविदास मालपे, वय अं.४६ वर्ष, धंदा–मजुरी

२) किशोर देविदास मालपे, वय अं.४४ वर्ष, धंदा– मजुरी

३) विनोद देविदासराव मालपे, वय अं.३२ वर्ष, धंदा– मजुरी

तिघेही रा.ब्राम्हणपुरी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत देविदास नत्थुजी मालपे व मयत ललिता देविदास मालपे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३२/२०२६ — ने.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) सुरेश मधुकरराव मांडळे, वय अं.६७ वर्ष, धंदा – मजुरी रा.ब्राम्हणपुरी, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुभाष मधुकरराव मांडळे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# लोकल फेऱ्यांची संख्या वाढणार : केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती, मुंबई-सावंतवाडी एक्स्प्रेसचा शुभारंभ



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई उपनगरीय रेल्वेची वाढती प्रवासी संख्या आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन रेल्वेची क्षमता वाढविण्यासाठी सुमारे १८ हजार कोटी रुपयांची विविध कामे सुरू आहेत. सध्या दररोज धावणाऱ्या सुमारे ३ हजार २०० लोकल फेऱ्यांची संख्या आधुनिक तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणातून २०३० पर्यंत ३ हजार ५०० पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी येथे दिली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १८ वर आयोजित मुंबई-सावंतवाडी एक्स्प्रेसच्या शुभारंभ कार्यक्रमात बोलताना वैष्णव यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे वरील माहिती दिली. लोकल प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी प्रत्येक लोकलमध्ये स्वयंचलित दरवाजे असावेत, असा निर्णय घेण्यात आला आहे. रेल्वे बोर्डाने २३८ वातानुकूलित लोकल रेकच्या निर्मितीचे आदेश दिले आहेत. या निर्मिती प्रक्रियेत मॉडर्न कोच फॅक्टरी आणि रेल कोच फॅक्टरी यांचा समन्वय राहणार आहे. नवीन वातानुकूलित लोकलची पहिली गाडी २०२७ मध्ये उपलब्ध होईल. तर २०३० पर्यंत सर्व २३८ रेकची निर्मिती आणि पुरवठा पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे वैष्णव यांनी यावेळी सांगितले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७२७/२०२६ नेे.ता.०३/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) सुशिला गंगाधरराव राईकवार, वय अं.५९ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.आलोडा, ता.वरुड, २) सौ.शांता नामदेवराव बागडे, वय अं.५० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.करजगांव (गांधीघर), ३) सौ.राजुस बाबाराव झाडोदे, वय अं.४५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.सुरळी, ४) चारुलता दौलत नागले, वय अं.४३ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.करजगांव (गांधीघर), ५) श्रीमती रंजना बाबुलाल नागले, वय अं.४४ वर्ष, धंदा- गृहिणी, ६) कु.टिना बाबुलाल नागले, वय अं.१९ वर्ष, धंदा- शिक्षण, ७) कुमार अंश बाबुलाल नागले, वय अं.१७ वर्ष, धंदा- शिक्षण, क्र.५ ते ७ रा.करजगांव, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.बुटीबोरी, नागपूर, ता.जि.नागपूर, (अर्जदार क्र.३ ची अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.१ आई)

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दौलत गंभीरराव नागले व मयत गंगुबाई दौलतराव नागले, रा.करजगांव ( गांधीघर ), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३१/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३८/२०२६ नेे.ता.२९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) सविता संजय घुनघुने, वय अं.५४ वर्ष, धंदा-गृहिणी

२) मनिष संजयराव घुनघुने, वय अं.३५ वर्ष, धंदा- मजुरी

दोन्ही रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

३) कल्पना गणेश इंगोले, वय अं.३२ वर्ष, धंदा- गृहीणी

रा.यशोदा नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत संजय संपतराव घुनघुने, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७२९/२०२६ नेे.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती सुमन लक्ष्मण बघेले, वय अं.८४ वर्ष,धंदा-निरंक

२) निर्मला लक्ष्मण बघेले, वय अं.४७ वर्ष, धंदा- मजुरी

क्र.१ व २ रा.बुधवार बाजार, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किसनराव परणु बघेले, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३०/२०२६ नेे.ता.०३/१०/२०२६**

**अर्जदार :-** शेख अकिल शेख सिकंदर, वय अं.४४ वर्ष, धंदा-मजुरी, रा.शहापुर, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.मोहम्मद जुल्फेकर शेख इलाही यांच्या घरी, शांती नगर, नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) रिजवानाबानो शेख रियाज, वय अं.४८ वर्ष, धंदा-मजुरी, रा.शहापुर, २) शेख शकिल शेख सिकंदर, वय अं.६२ वर्ष, धंदा-मजुरी, रा.वार्ड क्र.१२, चमन मोहल्ला, मोहम्मद लतिफ मो.हैदर यांचे घरी, रामाकोना, ता.सौंसर, ३) शहनाज बी शेख जाकिर, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम, रा.वार्ड क्र.१, चिचोली, खापरखेडा, ता.सावनेर, जि.नागपूर

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शेख सिकंदर शेख याकुब व मयत ईस्लामबी शेख सिकंदर, रा.शहापुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३१/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मुंबईतील पंचतारांकित हॉटेल रडारव : मराठी पाटी नसल्यास थेट कारवाई - दीक्षा कारकर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दुकाने, आस्थापनांवर मराठी पाटी ठळकपणे दिसतील, अशा स्वरूपात नसतील तर मुंबई पालिकेच्या दुकाने व आस्थापना विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे. आता मुंबईतील पंचतारांकित हॉटेलच्या प्रवेशद्वारावर दिसतील अशा स्वरूपात मराठी पाट्या नसतील तर थेट कारवाई करण्याचा इशारा विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी दिला आहे.

आस्थापनांवर देवनागरी लिपीतील मराठी नामफलक ठळक अक्षरांत लावणे बंधनकारक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले असतानाही अनेक व्यावसायिक आस्थापनांकडून या नियमाकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या दुकाने व आस्थापना विभागाकडून आता शहरातील पंचतारांकित हॉटेलांच्या नामफलकांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. मराठी नामफलक आढळून न आल्यास संबंधित हॉटेलांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिक्षा कारकर यांनी दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, देवनागरी लिपीतील मराठी नामफलक लावण्याची मुदत २५ नोव्हेंबर २०२३ रोजी संपल्यानंतर मुंबई महापालिकेने २८ नोव्हेंबर २०२३ पासून नियमांचे पालन न करणाऱ्या दुकाने व आस्थापनांविरोधात कारवाई सुरू केली होती. मुंबईत दुकाने, हॉटेल्स, चित्रपटगृहे आणि अन्य व्यावसायिक आस्थापना मिळून सुमारे १० लाख ८३

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( क.स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३७/२०२६ नेे.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती कांताबाई विठ्ठलराव बहुरुपी, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहीणी, २) नंदकिशोर विठ्ठलराव बहुरुपी, वय अं.४२ वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ व २ रा.राजुरा बाजार, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पंजाबराव श्रावणजी बहुरुपी व मयत देवकाबाई पंजाबराव बहुरुपी, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( क.स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४९/२०२६ नेे.ता.०१/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) शिवम कृष्णराव येवले, वय अं.४८ वर्ष,धंदा-शेती

रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती

२) श्रीमती मेघा प्रशांत वाटकर, वय अं.४१ वर्ष, धंदा-घरकाम

रा.प्लॉट नं.८३५, पवन नगर, कामठी रोड, अप्पलवाडी, नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **कृष्णराव बळीराम येवले व मयत लताबाई कृष्णराव येवले, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७२/२०२६ नेे.ता.०५/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीमती बेबी मधुकरराव ठाकरे, वय अं.६४ वर्ष,धंदा-गृहिणी

२) प्रमोद मधुकरराव ठाकरे, वय अं.४८ वर्ष, धंदा- शेती

दोन्ही रा.देशमुख पुरा, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मधुकर सुर्यभानजी ठाकरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०५/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४६/२०२६ नेे.ता. /१०/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुशिला निळकंठ ठाकरे, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम, २) किरण निळकंठ ठाकरे, वय अं.५३ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.वाठोडा, ता.वरुड, ३) सौ.सोनाली दिनकर होले, वय अं.५७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.३०१, ओम दिपालीया रामबाग, लेन नं.३, सावली अपार्टमेंट जवळ, कल्याण वेस्ट, कल्याण डी.सी., ठाणे, ४) सौ.वैशाली राजेंद्र झाडे, वय अं.५१ वर्ष, धंदा- घरकाम, रा.प्लॉट नं.३०८, नुतन शाळेजवळ, अभ्यंकर नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत निळकंठराव सपंतराव ठाकरे, रा.वठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ३० वर्षीय नराधमाचं ३ वर्षाच्या चिमुकलीसोबत गैरकृत्य

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – नवी मुंबईतील कामोठे परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका खासगी शाळेच्या बसमध्ये तीन वर्षांच्या चिमुकलीचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी ३० वर्षीय बसचालकाला अटक केली आहे. या प्रकरणी पनवेल न्यायालयाने त्याला शनिवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या घटनेमुळं नवी मुंबईत खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहिती



नुसार, आरोपी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी भाड्याने घेतलेल्या खासगी बसचा चालक होता. बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास त्याने कामोठे येथील बालवाडी आणि प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी बसमधून प्रवास सुरू केला. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी सोडल्यानंतर बसमध्ये संबंधित तीन वर्षांची चिमुकली एकटी राहिली. त्यावेळी आरोपी चालकाने तिच्यासोबत कथितरित्या गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. दरम्यान, या घटनेमुळं खळबळ उडाली असून, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं आहे.

**वैद्यकीय तपासणी केल्यानंतर प्रकार समोर**

घरी पोहोचल्यानंतर चिमुकलीने पोटदुखीची तक्रार केली. त्यानंतर तिने आपल्या आजीला बसमधील चालकाने तिच्यासोबत चुकीचे कृत्य केल्याचे सांगितले.

# शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट–क (अराजपत्रित) पदांच्या भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला असून, पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेला अखेर सुरुवात करण्यात आली आहे. या प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर सूचना व वेळापत्रक नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर येथील अपर आयुक्त कार्यालयांकडून




प्रसिद्ध करण्यात आले आहे. निर्धारित वेळापत्रकानुसार कागदपत्र पडताळणी प्रक्रिया ५ सप्टेंबर पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन–पेसा क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील एकूण २ हजार ४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

# कुस्तीपटू अश्विनी पौळ यांची ३ मुलांना घेऊन नळदुर्ग किल्ल्यावरुन उडी

## आता जीवन संपवण्यामागचं धक्कादायक कारण आलं समोर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**धाराशिव** – धाराशिवमधून एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. राष्ट्रीय स्तरावरील महिला कुस्तीपटू अश्विनी पौळ यांनी आपल्या तीन लहान मुलांसह ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यावरून १०० फूट खोल दरीत उडी घेतली आहे. या थरकाप



उडवणाऱ्या घटनेत कुस्तीपटू अश्विनी पौळ आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला. तर अडीच वर्षांच्या जुळ्या मुलींपैकी क्रांती नावाच्या चिमुरडीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच जुळ्या मुलींपैकी दुसरी मुलगी वीरा ही गंभीर जखमी असून, तिच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत. अश्विनी पौळ यांनी आपल्या तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावरून १०० फूट दरीत त्यांनी उडी घेतली. तर अडीच वर्षांच्या दुसऱ्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आणि एका मुलीवर धाराशिव येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अश्विनी पौळ यांनी मुलांना घेऊन आत्महत्याचं पाऊल उचललेल्या या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि क्रीडा जगतातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

अश्विनी पौळ यांच्या वडिलांचा धक्कादायक आरोप- पती आणि सासरच्या मंडळींच्या सततच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळूनच मुलीने आत्महत्या केल्याचा अश्विनी यांच्या वडिलांनी गंभीर आरोप केला आहे.

# पत्नीचा छळ : सासरच्यांकडून पैशांची मागणी

**पतीसह सासरकडील ८ जणांविरुद्ध गुन्हा**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरूड** – विवाहित महिलेचा पती व सासरच्या मंडळींकडून कथित छळ केल्याप्रकरणी पोलिसांनी पतीसह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी सबा मोहम्मद (२१), रा.खोलापूर यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार, फिर्यादी महिलेचा पती मोहम्मद एजाज मोहम्मद नजाकत हा दारु पिण्याच्या सवयीचा असुन तो नेहमी विनाकारण शिवीगाळ करीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे तसेच सासरच्या मंडळींकडून माहेरकडून पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पतीसह सासु-सासरे, दीर व नणंद यांच्याकडूनही विनाकारण भांडण करुन त्रास दिला जात असल्याचे महिलेने पोलिसांना दिलेल्या जबानीत म्हटले आहे.

फिर्यादी विवाहित महिलेच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी पती मोहम्मद एजाज मोहम्मद नजाकत, मोहम्मद अयफाज मोहम्मद नजाकत, मोहम्मद रियाज मोहम्मद नजाकत सर्व रा.खोलापुर, राबीया बानो मोहम्मद नजाकत, हुमा अंजुम जुबेर खान, जुबेर खान दोन्ही रा.ईफतेखार, रेषमा अंजुम ईषादोदीन, ईषादोदीन यांचे विरुध्द कलम ८५, ३५१ (२), ३५२ (३)(५) बी.एन.एस.अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शेंदुरजनाघाट पोलीस करीत आहेत.










